माहितीचा अधिकार

दूरध्वनी क्र.०२०-२५५०११२३
अपील प्राधिकारी तथा उप आयुक्त सामान्य प्रशासन यांचे कार्यालय, पुणे
महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे -४११ ००५
कार्यालयीन वेळ :- सकाळी १०.०० ते ०५.४५
जेवणाची सुट्टी :- दुपारी २.०० ते ०२.३०
ई मेल :- dmcgeneral@punecorporation.org
जावक क्रमांक :- उआ/सा.प्र/८
दिनांक :- ९/०४/२०१७

अपिल प्राधिकारी तथा उप आयुक्त सामान्य प्रशासन यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका

अपिल क्रमांक : पुणे मनपा /अ.प्रा.तथा उप आयुक्त सा.प्र./अपिल/०६/२०१७

**अपिलकर्त्याचे नाव व पत्ता :-**
डॉ.प्रशांत एन.चौधरी
ए ३/ए४, कंद अपार्टमेंट,
संघवीनगर, औंध, पुणे - ४११ ००७

**जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :-**
श्री.शाम तारू, प्रशासन अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

डॉ.प्रशांत एन.चौधरी- अपिलार्थी
विरुद्ध
श्री.प्रभुणे.जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष) कार्यालय पुणे महानगरपालिका

---

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

अपिलकर्ता यांनी दिनांक ०८/०७/२०१६ रोजी जन माहिती अधिकारी, पीसीपीएनडीटी कक्ष /अतिरिक्त महापालिका आयुक्त विशेष यांना मूळ माहिती अधिकारातील अर्ज सादर केला असून डॉ.वैशाली जाधव यांचे फेब्रुवारी २०१६ ते जुलै २०१६ या कालावधीत झालेल्या चौकशीबाबत माहिती मागितली आहे.सदरचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी, आरोग्य कार्यालय यांचेकडून जन माहिती अधिकारी, अतिरिक्त महापालिका आयुक्त विशेष कार्यालय यांचेकडे वर्ग करण्यात आला आहे.

अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, अतिरिक्त महापालिका आयुक्त विशेष कार्यालय यांनी अतिमआ/जमाअ/३३, दि.०९/०१/२०१७ रोजी **"आमचे कार्यालयाकडील माहिती जा.क्र.गोप/२५, दि.३०.०७.२०१६ रोजी मा.सहायक आरोग्य प्रमुख, पीसीपीएनडीटी विभाग यांचेकडे पाठविली असल्याचे** "लेखी कळविले आहे.